# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
Web portal : hinduprakashwarta.com
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ९४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## इराणकडून जॉर्डन-कुवेतमधील अमेरिकन लष्करी तळांवर हल्ल्याचा दावा

**तेहरान :** इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स (IRGC) आणि इराणी सैन्याने गुरुवारी कुवेत आणि जॉर्डनमधील अमेरिकन लष्करी तळांवर प्रत्युत्तरात्मक हल्ले केल्याचा दावा केला आहे. इराणच्या म्हणण्यानुसार, अमेरिकेकडून सातत्याने होत असलेल्या हल्ल्यांना उत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आली. मात्र, या दाव्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. इराणच्या सरकारी प्रसारमाध्यम संस्था ब्रॉडकास्टिंगच्या वृत्तानुसार, आयआरजीसी ने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की जॉर्डनमधील अमेरिकन लष्करी तळांवर तीव्र हल्ले करून अमेरिकेच्या THAAD क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीचा रडार नष्ट करण्यात आला.

## बाधित शेतकऱ्यांना मिळणार 'मोफत' पोलीस

**मुंबई :** ग्रामीण भागातील शेती, शेतरस्ते, वहिवाट किंवा पाण्याचे प्रवाह अडवणाऱ्या दंडेलीखोरांना चाप लावण्यासाठी राज्य शासनाने अत्यंत कठोर निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मामलतदार न्यायालय कायद्यात सुधारणा केल्या आहेत. या नव्या नियमांनुसार प्रकरणातील सुनावणीसाठी नोटीस थेट ई-मेलवर बजावली जाणार असून, तहसिलदारांचा (मामलतदार) आदेश न मानणाऱ्या अतिक्रमणदारांविरुद्ध बाधित शेतकऱ्याला मोफत पोलीस संरक्षण देणे आता बंधनकारक करण्यात आले आहे.

# थोडक्यात वार्ता

## बातमीचा इम्पॅक्ट : जिल्हा परिषदेतून महापुरुषांच्या प्रतिमा हटवल्या; परिसरही स्वच्छ



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** हिंदू प्रकाशवार्तानि जिल्हा परिषद परिसरात राजर्षी शाहू महाराज व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा कचऱ्यात पडल्याचे वृत्त प्रसिद्ध करताच प्रशासनाने तातडीने दखल घेतली. संबंधित ठिकाणावरील कचरा हटविण्यात आला असून महापुरुषांच्या प्रतिमा सन्मानपूर्वक तेथून हलविण्यात आल्या. तसेच संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली.

जिल्हा परिषद अध्यक्षांच्या कार्यालयालगत घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर प्रशासनाने तत्काळ कारवाई करून परिसर स्वच्छ केला. या घटनेमुळे महापुरुषांच्या प्रतिमांबाबत अधिक संवेदनशीलता बाळगण्याची गरज अधोरेखित झाली आहे. भविष्यात अशा प्रकारची घटना पुन्हा घडू नये, यासाठी संबंधित विभागाने आवश्यक खबरदारी घ्यावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

## जास्त परताव्याचे अमिष व्यापाऱ्याची 36 लाखाची फसवणूक


हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :-** व्यापाऱ्याला अनेक प्रकारच्या परताव्याचे मोठे मोठेआमिष दाखवून फसवणूक करण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणात चालू असून कधी महिन्यात डबल पैसे करून तर कधी वर्षभरात डबल पैसे करून असे सर्रास कायद्याची उल्लंघन करून राजरोसपणे हा गोरख धंदा चालतो अशाच एक अमिषाला बळी पडून परभणी येथील व्यापाऱ्याला कापड उद्योगात गुंतवणूक करून त्यावर परतावा देण्याचे आम्हीच दाखवत व्हाट्सअप वर ऑनलाइन लिंक पाठवून टप्प्याटप्प्याने व्यापाऱ्याकडून 36 लाख रुपये रुपये घेतले. परतावा देणे बंद केले आपली फसवणूक झाल्याचे व्यापाऱ्याच्या लक्षात आल्यानंतर व्यापाऱ्याने कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे याबाबत अधिक माहिती अशी की श्रीनाथ खानापुरे यांनी आपल्या तक्रारीत असे म्हटले आहे की आरोपी व्हाट्सअप क्रमांक धारक महिला रिधिमा असनानी हिच्यावर गुन्हा नोंद झाला असून 29 मे ते 15 जुलै 2026 या दरम्यान सदर महिलेने फिर्यादीच्या व्हाट्सअप वर ऑनलाइन लिंक पाठवली कापड उद्योगात गुंतवणूक केल्यास अधिक परतावा देण्याचे अमिष दाखवले .

## सिक्कीम टनल दुर्घटनेतील मृतांचा आकडा 25 झाला

**गंगटोक :** सिक्कीममधील एनएचपीसीच्या तीस्ता स्टेज-6 जलविद्युत प्रकल्पाच्या बांधकाम सुरू असलेल्या बोगद्यात मिथेन वायू गळतीमुळे झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत 25 कामगारांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. ही दुर्घटना सोमवारी दुपारी बोगद्याच्या आत मिथेन वायू गळती झाल्याने घडली होती. त्यानंतर सोमवारपासून बचाव आणि शोध मोहीम सातत्याने सुरू होती. एनएचपीसीच्या अधिकृत माहितीनुसार, दुर्घटनेच्या वेळी बोगद्याच्या आत 25 कामगार अडकले होते.

# दिल्लीत आंदोलन सुरु असताना आणखी दोन पेपर फुटले, परीक्षा रद्द




दिल्लीतील जंतर मंतरवर पेपरफुटी विरोधात आंदोलन सुरू असताना आता उत्तराखंडमधून मोठी बातमी समोर आली आहे. उत्तराखंड तांत्रिक विद्यापीठातील अभियांत्रिकीचे दोन पेपर फुटले आहेत, त्यानंतर आता विद्यापीठाने दोन्ही विषयांच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. या घटनेतील आरोपी शिक्षक आशीष कुमार हे शिवालिक कॉलेजमध्ये प्राध्यापक असून, ते प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या टीममध्ये होते. त्यांच्यावर परीक्षेतील प्रश्नांसारखेच प्रश्न एका कॉलेजच्या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये विद्यार्थ्यांना पाठवल्याचा आरोप आहे. हे प्रकरण समोर आल्यानंतर आता परीक्षा रद्द करण्यात आली असून या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

आरोपी शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल

उत्तराखंडमधील पेपरफुटीच्या घटनेनंतर या संपूर्ण प्रकरणात संबंधित महाविद्यालयाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. सध्या देशभरात पेपरफुटीविरोधात आंदोलन सुरू असताना ही घटना समोर आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. विद्यार्थी सातत्याने पेपरफुटी थांबवण्याची आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत आहेत. संपूर्ण देशात आवाज उठवला जात असताना ही धक्कादायक माहिती समोर आली आहे.

कुलगुरूंनी काय म्हटले?

वीर माधो सिंह भंडारी उत्तराखंड तांत्रिक विद्यापीठाच्या कुलगुरू तृप्ता ठाकूर यांनी सांगितले की, संबंधित शिक्षक ज्या महाविद्यालयाशी संबंधित आहेत, त्यांच्यावर कठोर कारवाईची करण्यात आली आहे. आमच्या विद्यापीठाने पुढील सात वर्षांसाठी त्या शिक्षकाला कोणत्याही परीक्षा प्रक्रियेत सहभागी होण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यांनी आपल्या 22 विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी तडजोड केली आहे.”

तृप्ता ठाकूर यांनी पुढे बोलताना म्हटले की, ‘अशा शिक्षकांना भविष्यात विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षेशी जोडले जाऊ नये, ही आमची नैतिक जबाबदारी आहे. संबंधित महाविद्यालयाने त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करायला हवा. आम्ही महाविद्यालयाला स्पष्टपणे सांगितले आहे की, त्यांनी केलेल्या कारवाईवर आम्ही समाधानी नाही. सुरुवातीला एका विषयाची प्रश्नपत्रिका फुटल्याचे समोर आले होते. मात्र चौकशीदरम्यान आणखी एक प्रश्नपत्रिकाही आधीच फुटल्याचे आढळले. त्यामुळे ती परीक्षाही रद्द करण्यात आली. या दोन्ही परीक्षा ऑगस्ट महिन्यात पुन्हा घेण्यात येतील, याच्या नवीन तारखा लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत.

## भारतात अनेक राज्यांत पूर, दरडी कोसळल्या

**नवी दिल्ली :** जुलै महिन्याच्या सुरुवातीला काहीसा मंदावलेला नैऋत्य मान्सून आता देशभरात पूर्णपणे सक्रिय झाला आहे. मान्सूनच्या या वादळी पुनरागमनामुळे भारतीय हवामान विभागाने (IMD) देशातील बहुतांश राज्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे. पुढील काही दिवसांत उत्तर, पश्चिम, मध्य, पूर्व आणि ईशान्य भारतात पावसाचा जोर कायम राहणार आहे. यामुळे अनेक भागांत अचानक येणारा पूर, दरडी कोसळणे, शहरांमध्ये पाणी साचणे आणि वाहतूक व्यवस्था कोलमडण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. देशभरात सध्या गुजरात राज्य पावसाच्या तडाख्यामुळे सर्वाधिक प्रभावित झाले आहे.

गुजरातच्या वलसाड जिल्ह्यात गेल्या २४ तासांत तब्बल ३६ इंच (सुमारे ९०० मिमी) पाऊस नोंदवला गेला आहे, ज्यामुळे संपूर्ण परिसरात गंभीर पूरस्थिती निर्माण झाली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने जिल्ह्यातील शाळा बंद ठेवल्या आहेत. तसेच पुराच्या पाण्यात अडकलेल्या २०० हून अधिक लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले असून मदतकार्य वेगाने सुरू आहे.

# सीजेपीकडून उद्या देशव्यापी आंदोलनाची घोषणा

### विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटनांना सहभागाचं आवाहन

**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटी आणि देशातील शिक्षणाचा दर्जा सुधारला जावा यासाठी कॉकरोच जनता पार्टीकडून राजधानी नवी दिल्लीत जंतर मंतरवर आंदोलन करण्यात येत आहे. कॉकरोच जनता पार्टी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर ठाम आहे. सीजेपीच्या 20 जुलैच्या मोर्चावर पोलिसांकडून लाठीमार करण्यात आला होता. त्या विरोधात कॉकरोच जनता पार्टीनं 24 जुलै रोजी देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. हे आंदोलन शांततापूर्ण मार्गानं करण्यात यावं, असं आवाहन करण्यात आलं आहे.

सीजेपीनं उद्या देशभरात होणारं आंदोलन प्रत्येक जिल्ह्यात व्हावं, संपूर्ण देशभरात एकाच वेळी आंदोलन करण्यात यावं, असं आवाहन केलं आहे. देशभरातील विविध विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटनांनी या सगळ्यात सहभागी व्हावं, असं आवाहन सीजेपीनं केलं आहे. या आंदोलनासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घ्याव्यात, असंही सांगण्यात आलं आहे. सर्व जण एकत्र आल्यानंतर सर्व संघटनांनी सीजेपीकडून करण्यात आलेल्या चार मागण्या सर्वांना वाचून दाखवाव्यात असं सांगण्यात आलं आहे.

आंदोलनस्थळी इन्कलाब जिंदाबाद आणि भारत माता की जय अशा घोषणा द्याव्यात, असं सीजेपीकडून सांगण्यात आलं आहे. सीजेपीनं चार प्रमुख मागण्या केल्या होत्या, त्यामध्ये धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला जावा, आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना सरकारनं एक कोटी रुपयांची नुकसान भरपाई दिली जावी. विद्यार्थी आंदोलकांवर गुन्हे दाखल करु नये. दिल्लीत विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांवर कारवाई व्हावी, अशी मागणी सीजेपी केलेली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काँग्रेसच्या सर्व खासदारांची त्यांच्या निवास्थानी बैठक बोलावली आहे.

### आज आंदोलकांना घाबरवलं, उद्या सामान्य माणसालाही अडकवतील;

# धमकी देणाऱ्या पोलिसांचा मुख्यमंत्र्यांनी ताबडतोब बंदोबस्त करावा : जयंत पाटील

**मुंबई :** पोलीस धमकी देतात याचा अर्थ त्यांना ड्रग्स सहज उपलब्ध होतं का? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा पोलिसांचा ताबडतोब बंदोबस्त केला पाहिजे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी व्यक्त केले. आज हे आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना घाबरवत आहेत, उद्या सामान्य माणसाला अडकवण्यासाठीही असंच करतील, अशी भीतीजयंत पाटील यांनी व्यक्त केली. बुधवारी मुंबई येथे झालेल्या आंदोलनादरम्यानचा पोलिस कर्मचाऱ्याचा विद्यार्थ्यांना धमकावणारा व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला आहे. या व्हायरल झालेल्या व्हिडिओव रजयंत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

सामान्य माणसाला अडकवण्यासाठीही असंच काही करतील

जयंत पाटील म्हणाले की, मुंबईतील एक पोलीस कर्मचाऱ्याने लहान आंदोलकांना धमकावणारा व्हिडिओ प्रसारित झाला आहे. या पोलिस कर्मचाऱ्यांकडे ड्रग्स येतात कुठून? पोलिस धमकी देतात याचा अर्थ त्यांना ड्रग्स सहज उपलब्ध होते. अशा पोलिसांचा ताबडतोब बंदोबस्त केला पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. तसेच मागील पावसाळी अधिवेशनात आपण वाढत्या ड्रग्सबाबत सभागृहात मुद्दा उपस्थित केला होता. काही पोलीस या ड्रग्स माफीयांकडून हफ्ते घेतात व हा काही पोलिसांचा सोर्स ऑफ इन्कम झाला आहे असंही मी म्हटलं होतं असं

# जबरी चोरीचे नाटक अवघ्या काही तासात उघड

### आरोपीकडून साडेतीन लाख रोख रक्कम जप्त; स्थानिक गुन्हा शाखेची कारवाई

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:-**मानवत रोड ते पेडगाव दरम्यान घडलेल्या जबरी चोरीच्या घटनेच्या बेबनाव स्थानिक गुन्हा शाखेने अवघ्या तीन तासात उघड. स्थानिक गुन्हा शाखेने एक आरोपीला अटक केली असून त्याच्याकडून साडेतीन लाख रुपये रोख रक्कम व मोबाईल मिळून चार लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे.




ग्राम परभणी ग्रामीण पोलिसात प्रथमेश शहाणे यांनी माहिती दिली होती तो दहिवाल ज्वेलर्स परतुर येथे कारागीर असून दुकान मालकाने त्याच्याकडे सात लाख रुपये रोख रक्कम दिली होती दुचाकीने परतूर सेलू मार्गे परभणीला येत असताना लघुशंकेसाठी थांबले असताना यावेळी अचानक पणे चाकूचा धाक दाखवून बळजबरीने धाकाबुकी करत हिसकावून चोरटे पसार झाले या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षकाने स्थानिक गुन्हे शाखेला तपासकरण्याच्या सूचना दिल्या. गजेंद्र सरोदे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला या तपासात माहिती देणाऱ्यानेच आपल्या साथी दाराच्या मदतीने जबरी चोरी झाल्याचा नाटक करून जबरी चोरी केल्याचे तपासदरम्यान तीन आरोपीने चोरी केल्याचे निष्पन्न झाले सदरील गुन्ह्यात पोलिसांनी इम्रान शेख याला ताब्यात घेऊन त्याच्या जवळील रोख साडेतीन लाख रुपये आणी एक मोबाईल असा एकूण चार लाखाचा मुदेमाल जप्त केला पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार गणेश सवंडकर पोलीस अंमलदार विलास सातपुते केशव लटपटे रणजीत आगळे सूर्यकांत फड रंगनाथ दुधाटे महेश कौठाळे राहुल परसोडे सचिन भदर्गे शरद सावंत दिलीप निल पत्रेवार यांच्या पथकाने ही कार्यवाही केली.

# जटवाडा-रसुलपुरा घाटात मोठी दरड कोसळली; सुदैवाने जीवितहानी टळली

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** खुलताबाद तालुक्यातून प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी आणि वाहनचालकांसाठी एक महत्त्वाची व मोठी बातमी समोर आली आहे. तालुक्यातील जटवाडा - रसुलपुरा घाटात अचानक दरड कोसळल्याची घटना घडली आहे. सततच्या पावसामुळे घाटात माती आणि सुटे खडक रस्त्यावर आल्यामुळे येथील दळणवळण विस्कळीत झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दरड कोसळली तेव्हा घाटातून काही वाहने जात होती. मात्र, सुदैवाने या अघटित दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नसल्याची माहिती समोर आली आहे. मोठा अनर्थ टळल्याने प्रशासनाने आणि नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. या दरडीमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात माती आणि दगड साचल्याने चारचाकी वाहनांची ये-जा पूर्णपणे ठप्प झाली आहे.


लहान व हलकी वाहने (दुचाकी) अत्यंत काळजीपूर्वक व हळूहळू मार्गक्रमण करत आहेत, मात्र चारचाकी व मालवाहू वाहनांना रस्ता पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. यामुळे घाटाच्या दोन्ही बाजूंना काही वेळ वाहनांच्या रांगा लागल्याचे दिसून आले. घटनेची माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित यंत्रणेला तात्काळ सतर्क करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता आणि पथक जेसीबी मशीनसह तातडीने घटनास्थळी दाखल होत असून, रस्ता मोकळा करण्याचे युद्धपातळीवर काम सुरू करण्यात आले आहे. लवकरच रस्ता दुरुस्त करून वाहतूक पूर्ववत होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# मटन दुकानाच्या परवान्यासाठी लाच घेणारा कंत्राटी डेटा ऑपरेटर जाळ्यात

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मटन विक्री दुकानाचा नवीन परवाना काढून देण्यासाठी ६,५०० रुपयांची लाच उकळणाऱ्या मुख्य पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयातील कंत्राटी डेटा ऑपरेटरला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहात पकडले आहे. या प्रकरणी क्रांतीचौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तक्रारदाराच्या चुलतभावाचे मटन विक्री दुकानाचा नवीन परवाना मिळण्याकरिता अर्ज केला होता. त्यासाठी भावाच्या वतीने तक्रारदार हे आरोपी अजय भगवान रोकडे (डेटा ऑपरेटर, कंत्राटी, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी कार्यालय) यांना भेटले असता, आरोपीने एकूण ६,५०० रुपये लाचेची मागणी केली होती. त्यापैकी १,००० रुपये रक्कम यापूर्वी फोन-पे द्वारे स्विकारली होती. उर्वरित रक्कम देण्याची तक्रारदाराची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार दिली. या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१ जुलै २०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये, आरोपीने तक्रारदाराकडे मटन शॉपचा नवीन परवाना देण्यासाठी ६,५०० रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले आणि त्याच वेळी त्याने तक्रारदाराकडून फोन पे द्वारे ५०० रुपये लाच रक्कम स्विकारली. त्यानंतर दिनांक २२ जुलै रोजी सापळा कारवाई दरम्यान आरोपीने तक्रारदाराकडून उर्वरित लाचेची रक्कम ५,००० रुपये फोन-पे वर स्विकारली. त्यानंतर आरोपीला दिनांक २३ जुलै २०२६ रोजी ताब्यात घेण्यात आले. सदर यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. वाल्मिक कोरे, तपास अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष तिगोते यांनी केली आहे.

## "शाल जोडे"




# अनधिकृत बांधकामे हटविणार; जी. श्रीकांत यांचा स्पष्ट इशारा; 31 जुलैपर्यंतच 90 टक्के सवलत, मुदतवाढ नाही

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (CSMRDA) हद्दीत प्रशासनाने अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. प्राधिकरणाची बैठक नुकतीच पार पडली असून, महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी या बैठकीत विकासाचा आढावा घेत अनेक महत्त्वाचे आणि कडक निर्देश दिले आहेत. मालमत्ता अभय योजनेअंतर्गत ३१ डिसेंबर २०२० पूर्वीची विनापरवाना बांधकामे नियमित करून घेण्यासाठी बेटरमेंट चार्जेसवर सध्या तब्बल ९० टक्के सवलत म्हणजेच फक्त १० टक्के शुल्क आकारले जात आहे. ही सवलत मिळण्याची ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत असून, यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही, असे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. पात्र नागरिकांनी तातडीने अर्ज करून आपली गुंठेवारी नियमित करून घ्यावी, अन्यथा १ ऑगस्ट ते ३१ ऑक्टोबर दरम्यान ५० टक्के शुल्क आकारले जाईल तर १ नोव्हेंबरपासून पूर्ण शुल्क द्यावे लागेल. ३१ डिसेंबर २०२० नंतरची अनधिकृत आणि नियमबाह्य बांधकामे हटविण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत. प्राधान्याने आणि शिस्तीत ही कारवाई पार पाडण्यासाठी निवृत्त सैनिकांचे एक विशेष 'टास्क फोर्स' तातडीने स्थापन करण्यात येणार आहे. याद्वारे रस्ते, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण आणि खाजगी जागेवरील अनधिकृत बांधकामांवर पारदर्शक पद्धतीने कारवाई केली जाईल. अनेक ठिकाणी इनामी जमिनींवर विनापरवानगी अनधिकृतपणे प्लॉटिंग करून ती विक्री केली जात असल्याप्रकरणी नागरिकांनी दक्ष राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. फसवणूक टाळण्यासाठी नागरिकांनी अशा जमिनींचे व्यवहार करताना सावध राहावे, असे सूचित करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेशात येऊ घातलेल्या टोयोटा किर्लोस्कर, Ather, JSW Green Mobility सारख्या आंतरराष्ट्रीय व नामांकित कंपन्यांमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होणार आहेत. याचा औद्योगिक व आर्थिक विकासाशी संबंध जोडत, या रोजगाराचा अधिकाधिक लाभ स्थानिकांना आणि विशेषतः महिलांना मिळवून देण्यासाठी धोरणात्मक अभ्यास करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. प्रशासनाच्या या कठोर भूमिकेमुळे नियमबाह्य बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून नागरिकांनी ३१ जुलैपूर्वी या सवलतीचा लाभ घेत आपली कागदपत्रे नियमित करून घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



### 1 ऑगस्टपासून ई-ऑफिस प्रणालीचा वापर

प्राधिकरणाच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी आगामी १ ऑगस्ट २०२६ पर्यंत 'ई-ऑफिस' प्रणाली सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, प्राधिकरण हद्दीत अंतिम रेखांकन मंजुरीवेळी अंतर्गत रस्ते, सांडपाणी व पाणीपुरवठा वाहिनी, विद्युत वाहिन्या आणि रस्त्यालगत देशी प्रजातीची झाडे लावणे यासारख्या मूलभूत सुविधांच्या गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

# सं पा द की य

## अमेरिकेचे औषध धोरण आणि भारतीय औषध निर्माण क्षेत्रापुढील आव्हान

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात केल्या जाणाऱ्या जेनेरिक औषधांवर टप्प्याटप्प्याने १०० टक्क्यांपासून तब्बल २०० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क (टॅरिफ) लागू करण्याची केलेली घोषणा ही भारतीय औषध निर्माण क्षेत्रासाठी अत्यंत चिंताजनक मानली जात आहे. अमेरिकेच्या या निर्णयाचा मुख्य उद्देश औषधांचे उत्पादन अमेरिकेतच पुन्हा सुरू करणे हा असला, तरी याचा मोठा फटका 'जगाची फार्मसी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारताला बसण्याची दाट शक्यता आहे. आगामी दोन वर्षांच्या सवलतीनंतर लागू होणारे हे टॅरिफ भारतीय कंपन्यांसमोर एक मोठे आर्थिक संकट आणि नवीन आव्हाने उभी करणारे ठरणार आहे. भारत हा अमेरिकेला जेनेरिक औषधांचा पुरवठा करणारा सर्वात मोठा देश असून, अमेरिकेतील एकूण जेनेरिक औषधांच्या वापरामध्ये भारतीय कंपन्यांचा मोठा वाटा आहे. अमेरिकन रुग्णांना स्वस्त आणि उच्च दर्जाची औषधे उपलब्ध करून देण्यात भारतीय कंपन्यांनी नेहमीच मोलाची भूमिका बजावली आहे. मात्र, ट्रम्प प्रशासनाच्या या धोरणामुळे भारतीय औषध निर्माण क्षेत्राच्या निर्यातीला मोठा दणका बसू शकतो. पुढील दोन वर्षांत अमेरिकेत उत्पादन प्रकल्प उभारणे सर्वच कंपन्यांना शक्य होणार नसल्याने, या अवाजवी टॅरिफचा थेट परिणाम कंपन्यांच्या नफ्यावर आणि पर्यायाने देशांतर्गत औषध उद्योगावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे आव्हान केवळ भारतीय कंपन्यांपुरते मर्यादित नसून, यामुळे खुद्द अमेरिकेतील आरोग्य यंत्रणा आणि सामान्य नागरिकही प्रभावित होऊ शकतात, कारण या निर्णयामुळे अमेरिकेत औषधांच्या किमती प्रचंड वाढण्याचा धोका आहे. केंद्र सरकारने आणि भारतीय औषध निर्मात्यांच्या संघटनांनी या धोरणाविरोधात राजनैतिक आणि व्यापारी स्तरावर तातडीने चर्चा करण्याची गरज आहे. या आव्हानात्मक परिस्थितीत भारतीय औषध क्षेत्राला नवीन जागतिक बाजारपेठांचा शोध घ्यावा लागेल आणि तंत्रज्ञानाच्या बळावर आपली स्पर्धात्मकता टिकवून ठेवावी लागेल, तरच या आंतरराष्ट्रीय राजकीय आणि व्यापारी दबावातून मार्ग काढणे शक्य होईल.

# ताम्बूल



**पूर्वी कोणी आपल्याकडे आलं वा आपण कोणाकडे गेलो तर काही तरी खाऊ घातल्याशिवाय जाऊ देत नसत. किमान चहा, कॉफी नाहीतर दूध अगदीच काही नको म्हटलं तर हातावर चमचाभर साखर तरी ठेवायची पद्धत होती.**

नागपूरला गेल्यावर "काही नको" म्हटलं तर "किमान पान तरी खाऊन जा" म्हणून आग्रह व्हायचा. लगेचच पानाचं तबक पुढे येई. हे सजलेलं पानाचं तबक मला माझ्या बालपणात घेऊन जाई. घरी सणासुदीला सवाष्ण ब्राह्मण वा कोणी जेवायला यायचं असेल तर विडे बनवायचं काम आम्हा मुलींकडे येई.

तबकात छान मोठी मोठी बदामाच्या आकाराची हिरवट पिवळसर रंगाकडे झुकलेली,मऊ नागवेलीची पानं, काथ, चुना, वाट्यांमधे मसाला सुपारी (घरी बनवलेली), बारीक लखनवी बडिशेप, गुलकंद, ताजं खोवलेलं ओलं खोबरं, वेलदोडा, लवंग, गुंजेचा पाला, अस्मन्तारा (पुदिन्याचा अर्क) अशी बरीच सामग्री असायची. पानांच्या गठ्ठ्यातील विडा बांधता येईल अशी सुबक पानं वेगळी काढून, पुसून, येणारे पाहुणे किती आहेत याचा हिशोब करत विडे एका पानाचे लोडाचे का दोन पानाचे घडीचे का तीन वा पाच पानाचे गोवंद विडे --- का सशाच्या कानाचे विडे हे ठरवत आम्ही विडे बांधत असू. पानं चांगली नाहीच मिळाली किंवा विसरली तर कोपऱ्यावरून पानपट्टी आणायचं कामही करावं लागे. पानपट्टी, लोडाचे, घडीचे, गोविंद वा कानाचे विडे हा चढत्या भांजणीने विड्याची श्रीमंती दाखवणारा सोपान आहे असं मला वाटतं.

विडा बांधणं ह्या कारागिरी इतकच विड्याच्या आतील रसायन जसं हवं तसं जमणं हे हेही कौशल्य असे. चुना कात जास्त नको. चुना जास्त झाला तर जीभ भाजते. जास्त काथ विडयाला कडवट चव देतो. पण विडा रंगायलाही हवा. काथ कमी झाला तर विडा रंगत नाही. गुलकंद प्रमाणातहवा. विडा फार गोड नको आणि कोरडा रुक्षही नको. सर्व काही प्रमाणात हवं. असा तोल सांभाळत निगुतिने केलेला विडा खाऊन पाहुण्यांनी कौतुक केलं की पानं नखलून दुखणारी बोटंही खूष होत.

आपल्याकडे काव्य प्रकारात विडा हा फार सुंदर काव्य प्रकार आहे. "विडा घ्या हो नारायणा" म्हणत रुक्मिणी आपल्या रुक्मिणीकांताला विडा देऊ करते. पत्नी आपल्या पतीला अथवा यथासांग पूजेनंतर भक्त आपल्या आराध्याला विडा/ तांबूल अर्पण करतो. ह्या काव्य विड्यांची बांधणी मोठी सुंदर असते. हीच कल्पना मनात धरून उमेच्या मुखात असलेल्या तांबुलाचं वर्णन शिखरिणीमधे करायचा अरुंधतीने प्रयत्न केला.

सदा शांतीच्या या हरित मनपर्णावर उमे
अशांती रूपी या नखलसि शीरा देठ निगुते
उमे जाळोनीया सकल अवघे मीपण सुखे
चुना मोतीयाचा धवल हळु लावी तव करे ॥ 3.1

मनाचा बुद्धिचा करुनी अडकित्ता कतरसी
मनीषांची साऱ्या अवघड सुपारी कुरकुरी
सुबुद्धीची घाली रुचकर बरी वेलचि वरी
विवेकाचा लावी लव अरुण तो काथ वरती ॥ 3.2

सुगंधी कस्तूरी विविध तव अंगीकृत कला
विड्यामध्ये घाली हृदय जणु का केशर अहा
महा वैराग्याची परिमलयुता जायपतरी
महा संकल्पाचे सबळ वर हे जायफळही॥ 3.3

तयी भावार्थाचा अति रुचिर कर्पूर सजवी
दयाबुद्धीरूपी सुमधुर खडीसाखर गुणी
विडा बांधूनी हा त्रयदशगुणी सात्विक अती
क्षमारूपी त्याच्यावर जणु लवंगा ठसविसी ॥ 3.4

असा घोळे जोची त्रयदशगुणी तांबुल मुखी
तुझ्या भक्तांना तो अनुपम सुखे दे मिळवुनी

उमेच्या मुखातला हा तांबूल साधासुधा नाही तो त्रयोदशगुणी ताम्बूल आहे. तिच्या सर्व गुणांनी रंगला आहे. भक्त त्याचे दोष जाळून, सर्व गुण एकत्रित करून बांधलेला ताम्बूल आपल्या आराध्याला अर्पण करतो. काही वेळेला मात्र वेगळा प्रसंगही येतो.

(सौंदर्य लहरींमधे) राक्षसांसोबत युद्ध जिंकल्यावर आपण युद्ध जिंकलं हे सांगण्यासाठी देवेंद्रासहित सर्व देव इतके उतावीळ होतात की, आपला पराक्रम सांगण्यासाठी, कौतुक करवून घेण्यासाठी सारे देव आपले युद्धभूमीवरील शिरस्त्राण, चिलखत/ कवच हा रणपोशाख न बदलताच प्रथम शिवाकडे न जाता मनापासून कौतुक करणाऱ्या आपल्या पार्वतीमातेचं दर्शन घ्यायला येतात. त्यावेळी पार्वती आपल्या मुखातील त्रयदशोगुणी तांबुल त्यांना भरवून आपल्या सर्व पुत्रांचं/ सर्व देवांचं कौतुक करते असं वर्णन आहे. (श्लोक 65)

मित्रांनो उमेच्या मुखातील तांबूल आहे तरी कसा ह्याचं वर्णन म्हणूनच आधी वर दिलं आहे. आपण आत्मसात केलेल्या सर्व विद्या, कला, गुण ह्यांच प्रतिक हा तांबूल आहे. हे सर्व गुण, कला विद्या जणु काही





तिच्या जिभेवरच ताम्बूल रूपात हजर आहेत. असा ताम्बूल आपल्या पुत्रांना सहज आत्मसात करता येईल अशा प्रकारे ती प्रत्येक पुत्राला भरवत आहे.

रणी दैत्यांना त्या करुनिच पराभूत सहजी
रणातूनी येती सुरगण कराया नमनची
असे अंगी त्यांच्या चिलखत रणी जे चढविले
सवे त्याच्या येती प्रथम करण्या वंदन उमे ।। 65.1

प्रसादाची माते धरुन मनि गे आस तुझिया
शिरीचे काढूनी मुकुट करती वंदन तुला
प्रसादा देऊनी सुखविसि सुरांसीच सकला
तुझ्या तांबूलाने सकल म्हणती धन्य क्षण हा ।। 65.2

अहो असा ताम्बूल मातेच्या मुखातून प्रत्यक्ष मिळाला तर निरस जीवन सर्व रसांनी परिपूर्ण नाही झालं तरच नवल! रंगहीन आयुष्य रंगात न्हाऊन निघालं नाही तरच आश्चर्य! निरुद्देश्य जीवनाला उद्दिष्ट सापडलं नाही तरच विस्मय!

**- अरुंधती प्रवीण दीक्षित -**

# पहाट अजून हरलेली नाही...

त्या दिवसानंतर त्याच्या आयुष्यात चमत्कार घडला नाही.

दुसऱ्याच दिवशी नोकरीचे पत्र आले नाही.

जगाचे प्रश्नही थांबले नाहीत.

पण एक गोष्ट बदलली होती—स्वतःकडे पाहण्याची त्याची दृष्टी.

घरी परतल्यावर आईने नेहमीप्रमाणे विचारले, "बाळा, चहा घेणार का?"

यावेळी त्याने फक्त मान हलवली नाही; तो हलकेच हसला.

त्या हसण्यात यश नव्हते, पण आशा होती.

वडिलांनी त्याच्याकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर काहीही बोलण्याची गरज नव्हती. मुलाच्या डोळ्यांत पुन्हा एकदा जगण्याची इच्छा दिसत होती. तीच त्यांच्यासाठी सर्वांत मोठी बातमी होती.

दिवस पुन्हा सुरू झाले.

पुन्हा अर्ज भरले गेले.

पुन्हा पुस्तके उघडली.

पुन्हा मुलाखती दिल्या.

काही ठिकाणी अपयश आले.

काही ठिकाणी प्रतीक्षा मिळाली.

परंतु यावेळी प्रत्येक नकार त्याला मोडून काढत नव्हता. तो प्रत्येक अनुभवातून काहीतरी शिकू लागला. त्याला उमगले की अपयश हे व्यक्तिमत्त्वाचे प्रमाणपत्र नसते; ते प्रवासातील एक टप्पा असतो.

एका संध्याकाळी त्याने त्या टेकडीवर पुन्हा जाण्याचे ठरवले.

नदी तशीच वाहत होती.

वटवृक्ष तसाच उभा होता.

पण त्या दिवशी वृद्ध तिथे नव्हते.

त्याने शांतपणे आजूबाजूला पाहिले.

जमिनीवर काही कोवळे अंकुर डोकावत होते.

त्याने हातातील ते बीज आठवले.

क्षणभर त्याला वाटले—कदाचित वृद्धांचे खरे अस्तित्व त्यांच्या शब्दांत नव्हते; त्यांनी जागवलेल्या विचारांत होते. काही भेटी आयुष्यभर सोबत चालतात, जरी ती माणसे पुन्हा कधी दिसली नाहीत तरी.

त्याने आकाशाकडे पाहिले.

सूर्य मावळतीकडे झुकत होता.

त्याच्या सोनेरी किरणांनी नदीला पुन्हा एकदा उजळवले होते.

तेव्हा त्याला एक नवे सत्य उमगले—

पहाट आणि संध्याकाळ या विरोधी नसतात.

एक दिवसाचा शेवट दुसऱ्या दिवसाच्या पहाटेची तयारी करत असतो.

जीवनही तसेच असते.

प्रत्येक पराभव हा नव्या प्रयत्नाचे बीज घेऊन येतो.

प्रत्येक अश्रू मनाला अधिक संवेदनशील बनवतो.

प्रत्येक प्रतीक्षा संयम शिकवते.

आणि प्रत्येक पहाट माणसाला सांगते—

"काल हरलास तरी आज पुन्हा चालायला सुरुवात कर."

त्या क्षणी त्याने मनाशी एक निश्चय केला—

परिस्थिती काहीही असो, स्वतःवरील विश्वास कधीच हरवायचा नाही. कारण जगातील प्रत्येक महान वृक्ष कधीकाळी एका छोट्याशा बीजाच्या रूपातच मातीच्या अंधारात दडलेला होता.

तो टेकडीवरून खाली उतरला.

त्याच्या पावलांमध्ये आता घाई नव्हती.

भीती नव्हती.

तक्रार नव्हती.

होता तो फक्त एक शांत विश्वास.

आकाशात उगवणाऱ्या प्रत्येक पहाटेची वाट पाहण्यापेक्षा, आपल्या मनात आशेची पहाट जिवंत ठेवणे अधिक महत्त्वाचे असते.

कारण...

पहाट सूर्यामुळे उजाडत नाही; ती माणसाच्या मनात पुन्हा जन्मलेल्या विश्वासामुळे उजाडते.

आणि म्हणूनच—

पहाट अजून हरलेली नाही

**- पांडुरंग मारुती धुमाळ**

# तरुणांचे स्वप्न वाचवा... राष्ट्राचे भविष्य घडवा!

**जेव्हा तरुण भविष्याच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरतात... तेव्हा प्रश्न एका पिढीचा नसतो, तर संपूर्ण देशाचा असतो! युवा आपल्या भविष्याच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरायला भाग पडतात, तेव्हा तो केवळ त्यांचा प्रश्न राहत नाही; तो संपूर्ण देशाच्या विवेकाला जागं करणारा प्रश्न बनतो.**




"कोणत्याही देशाची खरी ताकद त्याच्या सीमा, संपत्तीवर नसते. तर त्या देशाची खरी ताकद असते तरुणाईमध्ये. कारण आजचा तरुण विद्यार्थीच उद्याचा शास्त्रज्ञ, शिक्षक, डॉक्टर, अभियंता, सैनिक, न्यायाधीश, उद्योजक आणि लोकशाहीचा सजग नागरिक असतो. पण जेव्हा हाच तरुण आपल्या शिक्षणाच्या, रोजगाराच्या आणि भविष्याच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरतो, तेव्हा प्रत्येक संवेदनशील नागरिकाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे आपण आपल्या तरुणांना नेमकं काय देत आहोत?आज देशभर विविध ठिकाणी विद्यार्थी आणि युवक शिक्षणातील अडचणी, भरती प्रक्रियेतील विलंब, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, पेपरफुटी, रिक्त पदे, वाढती बेरोजगारी आणि अस्थिर रोजगाराच्या प्रश्नांमुळे आवाज उठवत आहेत. त्यांच्या हातात दगड नाहीत; त्यांच्या डोळ्यांत स्वप्नं आहेत. त्यांच्या घोषणांमध्ये द्वेष नाही; त्यांच्या मागण्यांमध्ये न्यायाची अपेक्षा आहे.आज अनेक तरुण उच्च शिक्षण पूर्ण करूनही नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. वर्षानुवर्षे भरती प्रक्रिया रखडते, परीक्षा होतात पण निकाल लांबतो, काही ठिकाणी पेपरफुटीच्या घटना घडतात, तर काही ठिकाणी न्यायालयीन प्रक्रियेमुळे उमेदवारांचे आयुष्य थांबून राहते. एका स्पर्धा परीक्षेसाठी लाखो युवक दिवस-रात्र अभ्यास करतात. कुटुंब आर्थिक अडचणी सहन करत असते. आई-वडील आपल्या मुलाच्या यशाची वाट पाहत असतात. पण जेव्हा व्यवस्था वेळेवर न्याय देत नाही, तेव्हा निराशा आणि असंतोष वाढणे स्वाभाविक आहे.

शिक्षण हा केवळ पदवी मिळवण्याचा मार्ग नाही; तो स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार आहे. रोजगार हा केवळ पगार मिळवण्याचा विषय नाही; तो कुटुंब उभं करण्याचा, समाजात सन्मानाने जगण्याचा आणि देशाच्या विकासात योगदान देण्याचा पाया आहे.भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान संधीचे स्वप्न दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे सर्वात मोठे शस्त्र म्हटले. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाला मुक्तीचा मार्ग मानला. राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण आणि सामाजिक न्यायाची दारे सर्वांसाठी खुली केली. त्यांच्या विचारांचा खरा सन्मान करायचा असेल, तर प्रत्येक तरुणाला गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि न्याय्य रोजगाराची संधी मिळाली पाहिजे.

आज खऱ्या अर्थाने गरज आहे ती संघर्षाची नव्हे, तर संवादाची. मग आंदोलन कोणतेही असो आंदोलकाशी संवाद साधला गेला पाहिजे.आंदोलने टोकाला जाण्यापूर्वी शासन, प्रशासन, शैक्षणिक संस्था आणि समाज यांनी युवकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहिले गेले पाहिजे. कारण तरुणांच्या मनात जर विश्वास निर्माण झाला, तर देशाची प्रगती निश्चित आहे. पण त्यांच्या मनात जर नैराश्य वाढले, तर त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर होतो. आपण तरुणांना फक्त संयमाचा सल्ला देऊन चालणार नाही; त्यांना विश्वासही द्यावा लागेल. भरती प्रक्रिया पारदर्शक, परीक्षा सुरक्षित, शिक्षण परवडणारे आणि रोजगारनिर्मिती प्रभावी झाली, तर आंदोलनांची गरजच उरणार नाही. आज रस्त्यावर उभा असलेला प्रत्येक विद्यार्थी हा कुणाचा तरी मुलगा, मुलगी, भाऊ किंवा बहीण आहे. त्याच्या डोळ्यांत फक्त स्वतःचं नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचं भविष्य असतं. त्याच्या हातातील फलकावर लिहिलेली मागणी ही केवळ नोकरीची नसते; ती सन्मानाने जगण्याच्या अधिकाराची असते.देशाचा विकास फक्त आकडेवारीने मोजला जात नाही; तो आपल्या तरुणांच्या चेहऱ्यावरच्या आशेने मोजला जातो. म्हणूनच, जेव्हा तरुण आपल्या भविष्याच्या संरक्षणासाठी रस्त्यावर उतरतात, तेव्हा त्यांच्या आवाजाकडे केवळ आंदोलन म्हणून पाहू नये, तर तो लोकशाहीचा जिवंत श्वास आहे, असे समजून ऐकले पाहिजे.

कारण तरुणांचे स्वप्न वाचले तरच देशाचे भविष्य सुरक्षित राहील. शिक्षण हा हक्क आहे, रोजगार हा सन्मान आहे आणि आशावादी तरुणाई हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे. त्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने जिवंत ठेवणे ही केवळ शासनाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

जेव्हा एखादा तरुण शिक्षणाच्या हक्कासाठी, रोजगाराच्या संधीसाठी किंवा आपल्या भविष्याच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर उतरतो, तेव्हा त्याला केवळ आंदोलनकर्ता म्हणून पाहू नका. त्याच्या हातातील फलकामागे त्याच्या आई-वडिलांचे कष्ट, कुटुंबाच्या अपेक्षा, अपूर्ण स्वप्ने आणि उद्याच्या उज्ज्वल आयुष्याची आस दडलेली असते.

कोणताही तरुण आंदोलन करण्यासाठी जन्माला येत नाही. तो पुस्तकं हातात घेऊन वर्गात बसू इच्छितो, मेहनतीच्या बळावर स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊ इच्छितो, स्वतःच्या कर्तृत्वाने नोकरी मिळवून आपल्या कुटुंबाचा आधार बनू इच्छितो. पण जेव्हा शिक्षणाची दारे कठीण होतात, भरती प्रक्रिया वर्षानुवर्षे रखडते, गुणवत्तेपेक्षा अनिश्चितता वाढते आणि आशेपेक्षा नैराश्य अधिक दिसू लागते, तेव्हा त्याचा आक्रोश रस्त्यावर उमटतो. हा आक्रोश व्यवस्थेविरुद्ध नसून, न्यायाच्या अपेक्षेचा असतो.आज गरज आहे ती तरुणांच्या आवाजाला दडपण्याची नाही, तर तो मनापासून ऐकण्याची. कारण इतिहास साक्षी आहे ज्या राष्ट्राने आपल्या तरुणांच्या स्वप्नांना बळ दिले, ते राष्ट्र जगात अग्रस्थानी पोहोचले; आणि ज्या राष्ट्राने त्यांच्या आशा-आकांक्षांकडे दुर्लक्ष केले, ते विकासाच्या शर्यतीत मागे पडले.शिक्षण हा दान नसून घटनात्मक अधिकार आहे. रोजगार ही कृपा नसून प्रत्येक कष्टकरी तरुणाचा स्वाभिमान आहे. म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण, प्रत्येक पात्र युवकाला न्याय्य संधी आणि प्रत्येक मेहनती हाताला सन्मानाचे काम मिळणे ही लोकशाहीची खरी कसोटी आहे.

आज लाखो तरुण स्पर्धा परीक्षांसाठी दिवस-रात्र अभ्यास करत आहेत. अनेक पालक कर्ज काढून मुलांना शिक्षण देत आहेत. आई आपल्या लेकराच्या यशासाठी मोलमजुरी करते, वडील स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून मुलांच्या स्वप्नांना बळ देतात. गावाकडच्या छोट्याशा घरातून शहरात आलेला विद्यार्थी एका स्वप्नासाठी झगडत असतो एक चांगली नोकरी, स्वाभिमानाने जगण्याची संधी आणि आपल्या आई-वडिलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य पाहण्याची इच्छा. पण जेव्हा त्याच्या वाट्याला वारंवार अनिश्चितता, विलंब, बेरोजगारी आणि निराशा येते, तेव्हा त्याचा आक्रोश समाजाने ऐकला पाहिजे.

कोणताही विद्यार्थी आंदोलनाची भाषा शिकून जन्माला येत नाही. तो पुस्तकांची भाषा शिकतो, संविधानाची भाषा शिकतो, लोकशाहीवर विश्वास ठेवायला शिकतो. पण जेव्हा त्याला न्याय मिळण्यात विलंब होतो, तेव्हा त्याचा आवाज रस्त्यावर उमटतो. त्या आवाजात रागापेक्षा वेदना अधिक असते; विरोधापेक्षा अपेक्षा अधिक असते; आणि संघर्षापेक्षा भविष्य वाचवण्याची धडपड अधिक असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" हा मंत्र दिला, तो संघर्ष विध्वंसासाठी नव्हे तर न्यायासाठी होता. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाला मुक्तीचे साधन मानले. राजर्षी शाहू महाराजांनी समान संधीचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आयुष्य वेचले. त्या महापुरुषांच्या विचारांचा खरा वारसा जपायचा असेल, तर प्रत्येक तरुणाला गुणवत्तापूर्ण शिक्षण, पारदर्शक परीक्षा व्यवस्था, न्याय्य भरती प्रक्रिया आणि सन्मानजनक रोजगार मिळवून देणे ही आपल्या लोकशाहीची नैतिक जबाबदारी आहे.समाज म्हणून आपणही स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे आपण आपल्या तरुणांकडून फक्त संयमाची अपेक्षा करतो, की त्यांच्या स्वप्नांची जबाबदारीही स्वीकारतो? कारण बेरोजगारी हा केवळ आर्थिक प्रश्न नसतो; तो मानसिक, सामाजिक आणि कौटुंबिक वेदनांचा प्रश्न असतो. एक तरुण खचला तर त्याच्यासोबत संपूर्ण कुटुंब खचते. एका विद्यार्थ्याचे तुटलेले स्वप्न म्हणजे एका आईच्या डोळ्यांतील पाणी, एका वडिलांच्या कष्टांचे मोल न मिळणे आणि एका राष्ट्राच्या विकासाला बसलेली अदृश्य ठेच असते.

म्हणून आज गरज आहे ती आश्वासनांची नव्हे, तर विश्वासाची; घोषणांची नव्हे, तर कृतीची; आणि संघर्ष वाढवण्याची नव्हे, तर संवादातून मार्ग काढण्याची. तरुणांच्या मनात लोकशाहीबद्दलचा विश्वास टिकवणे ही शासन, प्रशासन, शैक्षणिक संस्था आणि समाज या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

चला, आपण अशी भारताची निर्मिती करूया जिथे कोणत्याही तरुणाला आपल्या भविष्याची भीक मागण्यासाठी रस्त्यावर उभे राहावे लागणार नाही. जिथे शिक्षण हा प्रत्येकाचा हक्क असेल, रोजगार हा प्रत्येकाच्या कष्टांचा सन्मान असेल आणि प्रत्येक तरुणाच्या डोळ्यांत उद्याची नवी पहाट दिसेल. कारण देशाच्या संसदेत मांडले जाणारे अर्थसंकल्प, विकासाचे आराखडे आणि मोठमोठ्या घोषणा तेव्हाच अर्थपूर्ण ठरतात, जेव्हा देशातील प्रत्येक तरुणाच्या चेहऱ्यावर आशेचे हास्य फुलते. राष्ट्राची खरी प्रगती महामार्ग आणि पूल बांधून होत नाही; ती आपल्या तरुणांच्या स्वप्नांना पंख मिळाल्यावरच होते.

म्हणूनच आज प्रत्येक संवेदनशील नागरिकाने, प्रत्येक लोकप्रतिनिधीने आणि प्रत्येक धोरणकर्त्याने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे तरुणांचे भविष्य सुरक्षित असेल, तरच लोकशाही मजबूत राहील; शिक्षणाचा सन्मान आणि रोजगाराची हमी असेल, तरच समाजात शांतता, समता आणि प्रगती नांदेल. अन्यथा इतिहास प्रत्येक पिढीला एकच प्रश्न विचारत राहील 'देशाकडे तरुण होते, पण त्यांच्या स्वप्नांचे काय झाले?' लेखक हे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त आहेत.

**लेखक**
**समाजभूषण रामदास**
**वच्छालामाई रखमाजी वाघमारे**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो. नं. 8888125610**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## जि.प..प्र. शाळा मादणी येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी



**मादणी, दि. २३ जुलै २०२६ :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मादणी, केंद्र शिवना येथे गुरुवार, दिनांक २३/०७/२०२६ रोजी भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे महानायक, राष्ट्रपुरुष आणि "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच" हा प्रेरणादायी संदेश देणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. यावेळी शाळेतील शिक्षक श्री चोरमले सर, जिऊघाले सर, श्री पाटील सर, शकील सर, श्रीमती अवनकर मॅडम,श्रीमती पखन मॅडम,श्रीमती दांडगे मॅडम व विद्यार्थ्यांनी टिळकांच्या कार्याला आदरांजली वाहिली.

या प्रसंगी श्री. शकील अहमद सर यांनी लोकमान्य टिळक यांच्या जीवनकार्याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी टिळकांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना, गणेशोत्सव व शिवजयंतीच्या माध्यमातून जनजागृतीचे कार्य तसेच देशभक्ती, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक बांधिलकी याविषयी प्रेरणादायी माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

## बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये लोकमान्य टिळक जयंती उत्साहात साजरी



**बिडकीन (प्रतिनिधी):** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल येथे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे प्रणेते, थोर राष्ट्रनेते आणि समाजजागृतीचे प्रेरणास्थान लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता तोतला यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, “स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच” हा लोकमान्य टिळकांचा प्रेरणादायी विचार आजही प्रत्येक भारतीयाला राष्ट्रप्रेम, स्वाभिमान आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा देतो. त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवाच्या माध्यमातून समाजात राष्ट्रीय एकात्मता निर्माण केली. तसेच शिक्षण, सामाजिक जागृती आणि स्वातंत्र्य चळवळीत त्यांचे योगदान अतुलनीय असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन देशाचे सुजाण नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## स्वच्छतेची वारी, विठुरायाच्या दारी; मनपाची अनोखी स्वच्छता दिंडी 25 जुलैला

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर वाळूज पंढरपूर येथे विठ्ठल दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने यंदा "स्वच्छतेची वारी... विठुरायाच्या दारी" हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत २५ जुलै रोजी सकाळी १० वाजता महावीर चौकातून स्वच्छता दिंडीला प्रारंभ होणार असून बाबा पेट्रोल पंप ते वाळूज पंढरपूर या सुमारे आठ किलोमीटरच्या मार्गावर प्रत्यक्ष स्वच्छता करत ही दिंडी पुढे जाणार आहे. या उपक्रमाच्या नियोजनासाठी महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष आढावा बैठक पार पडली. यावेळी उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेते गोविंद केंद्रे, विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद तसेच आयुक्त अमोल येडगे उपस्थित होते.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारीही बैठकीस उपस्थित होते. बैठकीत वारी मार्ग, शहरातील विठ्ठल मंदिरे, मंदिर परिसर आणि गर्दीच्या ठिकाणी विशेष स्वच्छता पथके नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. कचरा संकलनाची वारंवारता वाढविणे, अतिरिक्त घंटागाड्या उपलब्ध करणे आणि तात्पुरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# सावधान भगर खाताय... मग हे वाचाच...!

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**-शनिवार, दि. २५ जुलै २०२६ रोजी देवशयनी आषाढी एकादशी आहे. एकादशीला मोठ्या प्रमाणात भाविक उपवास करतात. उपवासाला मोठ्या प्रमाणात भगरीचे सेवन केले जाते. तुम्ही पण उपवासाला भगरीचे वेगवेगळे पदार्थ करुन खाण्याचे ठरवत असाल तर थोडं थांबा... आधी हे वाचा....

भगर खाल्ल्यामुळे अन्न विषबाधा झाल्याच्या अनेक घटना महाराष्ट्रात वारंवार घडत आहेत. त्यामूळे भगर खाताना थोडी काळजी घ्या. खर तर भगर हा भरड धान्याचा एक प्रकार आहे. भगर तयार करण्यासाठी प्रामुख्याने वरई, सावा, बर्टी व कोद्रा या धान्याचा वापर करतात.

भगर तयार करण्यासाठी उपयोगात आणलेल्या धान्यावरून भगरचे प्रकार पडतात. उदा. बरई भगर, सावा भगर, बर्टी भगर व कोद्रा भगर. वरई भगर सर्वात उच्च प्रतीची तर कोद्रा भगर सर्वात हलक्या प्रतीची समजली जाते.

भगरीमुळे कार्बोहायड्रेटस आणि डायट्रि फायबर्स मिळतात जे आरोग्यदायी आहेत. याशिवाय भगरीमध्ये कॅल्शिअम, फॉस्परस, मॅग्नेशियम यासारखी खनिजे ही असतात. भगरीचा ग्लायकॉमिक इंडेक्स कमी असल्याने मधूमेही रुग्णांसाठी देखील भगर हा उत्तम आहार आहे. मग अशी सत्वगुणी भगर आरोग्याला अपायकारक का ठरते आहे? या प्रकरणांचा अन्न व औषध प्रशासनाने अभ्यास केला असता या सगळ्याची जी कारणमिमांसा समोर येते ती अशी.

भगरीवर मोठ्या प्रमाणात एस्परजिलस टामारी प्रजातीच्या दूरशीचा प्रादुर्भाव होतो. ज्या मूळे फ्युमिगॅक्लाविन ए

सायक्लोपायझॉनिक आम्ल यासारखी विषद्रव्ये तयार होतात. याशिवाय ॲफ्लाटॉक्सिन

एर्गोटॉक्सिन्स यासारखी बूरशीमूळे तयार होणारी मायकोटॉक्सिन्स यामध्ये असू शकतात. २५ ते ३२ सेंग्रे. तापमान आणि आर्द्रता दूरशीच्या वाढीसाठी अनुकूल असते. अशी दूरशीचा प्रादुर्भाव झालेली भगर खाण्यात आल्यास अन्न विषबाधा होऊ शकते.

भगर खाताना काय काळजी घ्याvi

बाजारातून भगर आणल्या नंतर ती निवडून स्वच्छ करा. शक्यतोवर पाकीटबंद भगर घ्या. अनब्रँडेड किंवा लेबल नसलेली भगर पाकीटे व सूटी भगर घेऊ नका. भगर घेतांना पाकीटावरचा पॅकींग दिनांक व अंतिम वापर दिनांक तपासा.

भगर साठवताना ती स्वच्छ कोरड्या ठीकाणी, व्यवस्थित झाकणबंद डब्यात ठेवा, जेणेकरुन वातावरणातील ओलाव्यामूळे दूरशीची वाढ होणार नाही. जास्त दिवस भगर साठवू नका. जास्त दिवस साठवलेली भगर खाऊ नका.

शक्यतोवर भगरीचे पीठ विकत आणू नका, भगरीच्या पिठामध्ये वातावरणातील ओलावा शोषून घेण्याची क्षमता आधिक असते. त्यामूळे पिठाला बुरशीची लागण होण्याची शक्यता जास्त असते, भगरीच्या दशम्या किंवा भाकरी खाण्याऐवजी खिचडी खावी.

मगरीचे पीठ आवश्यक असेल तेवढेच दळून घ्या. जास्त दिवस पीठ साठवू नका. बाहेरुन दळून आणण्यापेक्षा घरीच दळा. जाड भगर टाळा

मगर आणि शेंगदाणे हे आधिक प्रथिनयुक्त पदार्थ आहेत. दोन तिन दिवस सलग उपवास असतांना या पदार्थाचे सेवन ॲसिडीटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ व पोटाचे त्रास होतात. या पदार्थाचे सेवन पचनशक्ती नूसार मर्यादितच करावे.

भगरीचे सेवन करतांना या गोष्टी लक्षात ठेवा. म्हणजे संभाव्य अपाय टाळता येईल.

भगर विक्रेत्यांसाठी सुचना

विक्रेत्यांनी पॅकबंद भगरचीच विक्री करावी. भगर खरेदी करतांना घाऊक विक्रेत्याकडून पावती घ्यावी.

भगरीचे पॅकेट, पोत्यावर उत्पादकांचा पत्ता, परवाना क्र., पॅकींग दिनांक, अंतिम वापर दिनांक असल्याची खात्री करून घ्या.

मुदत बाह्य भगर किंवा भगर पिठाची विक्री करु नये.

सुटी भगर व खूले भगर पिठ शक्यतो विक्रीसाठी ठेऊ नये.

उपवास श्रद्धेचा असला, तरी आरोग्याची काळजीही तितकीच महत्त्वाची आहे. सुरक्षित, दर्जेदार आणि मुदतीत असलेली भगरच वापरा. थोडीशी दक्षता घेतल्यास अन्न विषबाधीचा धोका सहज टाळता येतो, काळजी घ्या, दक्ष राहा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त (अन्न)अनंतकुमार चौधरी यांनी केले आहे


## जिल्हा परिषदेत लोकमान्य टिळकांची 170 वी जयंती साजरी

### उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार; टिळकांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच," अशी सिंहगर्जना करत भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा देणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १७० व्या जयंतीनिमित्त गुरुवारी जिल्हा परिषदेत अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) राघवेंद्र घोरपडे, प्रभारी जिल्हा उपायुक्त डॉ. रमण इंगळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांनी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रभक्ती, स्वाभिमान आणि लोकजागृतीच्या कार्याचा गौरव केला. टिळकांची विचारधारा आणि राष्ट्रसेवेचा आदर्श नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा जयंती साजरी करण्यामागील मुख्य उद्देश असून, अशा उपक्रमांमुळे युवकांना प्रेरणा मिळते, असे त्यांनी सांगितले.

प्रभारी जिल्हा उपायुक्त डॉ. रमण इंगळे यांनी लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी दिलेले योगदान आणि त्याग देशासाठी अमूल्य असल्याचे नमूद केले. त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी जयंती साजरी करणे ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक पशुधन विकास अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर बिडाईत यांनी केले, तर उपस्थितांचे आभारही त्यांनी मानले.

## राजकुंवर महाविद्यालयात लोकमान्य टिळक आणि क्रांतीवीर चंद्रशेखर आझाद यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**फर्दापूर (प्रतिनिधी) :**'फर्दापूर स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' अशी सिंहगर्जना करणारे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महान राष्ट्रपुरुष लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि देशासाठी प्राणांची आहुती देणारे थोर क्रांतीवीर चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीनिमित्त फर्दापूर येथील **राजकुंवर महाविद्यालयात** एका अत्यंत प्रेरणादायी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने महाविद्यालयात देशभक्ती आणि राष्ट्रसेवेचा एक अनोखा जागर पाहायला मिळाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य टिळक आणि क्रांतीवीर चंद्रशेखर आझाद यांच्या प्रतिमांचे विधिवत पूजन करण्यात आले. या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून या दोन्ही महान राष्ट्रपुरुषांच्या अजोड बलिदानाचे आणि थोर कार्याचे स्मरण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महापुरुषांच्या जीवनकार्यावर आणि त्यांच्या संघर्षावर प्रकाश टाकला. 'आजच्या तरुण पिढीने आणि विद्यार्थ्यांनी या महापुरुषांचा ज्वलंत आदर्श डोळ्यांसमोर ठेवून राष्ट्रसेवा, प्रखर देशभक्ती आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा घ्यावी,' असे अत्यंत अभ्यासपूर्ण आणि दिशादर्शक प्रतिपादन यावेळी करण्यात आले.

या प्रेरणादायी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य **प्रा. डॉ. ए. जे. बेडवाल** हे उपस्थित होते. तर, **प्रा. वाय. आर. पाटील** यांनी प्रमुख पाहुणे म्हणून स्थान भूषविले. कार्यक्रमाचे अत्यंत नेटके आणि उत्तम सूत्रसंचालन **प्रा. एम. बी. शिंदे** यांनी केले.

## भारतीय संस्कृती आणि नैसर्गिक शेतीचा आधार देशी गोवंश : कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

. **परभणी:**-महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्या संकरीत गो-पैदास प्रकल्पाच्या वतीने दिनांक २२ जुलै २०२६ रोजी विद्यापीठात ‘शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यापीठातील संकरीत गो-पैदास प्रकल्पाची स्थापना सन १९७५ मध्ये देशी गोवंशाचे जतन व संवर्धन तसेच संकरीकरणाद्वारे दुग्धोत्पादन वाढविण्याच्या उद्देशाने करण्यात आली. या प्रकल्पांतर्गत देशी गोवंशाच्या संवर्धनाबरोबरच उत्पादन व प्रजनन गुणधर्मांवर सातत्याने संशोधन केले जात आहे. सध्या प्रकल्पावर होलदेव व देवणी जातींचे एकूण १६९ गोवंश असून त्यापैकी ८७ शुद्ध देवणी जातीचे आहेत. देशी गायीचे दूध, शेण व गोमूत्र यांचे कृषी, पर्यावरण आणि पोषणदृष्ट्या असलेले महत्त्व लक्षात घेऊन शासनाने देशी गोवंशाच्या संवर्धनावर विशेष भर दिला असून देशी गायीस 'राज्यमाता गोमाता' हा दर्जा प्रदान केला आहे.

यानिमित्ताने दुपारच्या सत्रात विद्यापीठाच्या संशोधन संचालनालयाच्या सभागृहात मराठवाड्यातील पशुपालकांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस तसेच महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि होते. प्रमुख उपस्थितीमध्ये संशोधन संचालक डॉ. भगवान असेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश आहिरे तसेच प्रमुख वक्ते म्हणून पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विश्वास साळुंखे उपस्थित होते. याशिवाय पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. गजेंद्र लोंढे, विभागातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच मराठवाड्यातील पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी भारतीय संस्कृती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शाश्वत कृषी व्यवस्थेमध्ये गोवंशाचे अनन्यसाधारण स्थान अधोरेखित केले. त्यांनी भारतीय परंपरेतील गोवंशाचे प्राचीन महत्त्व, गोरज मुहूर्ताचे धार्मिक व वैज्ञानिक महत्त्व, मातीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविणे, जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे, तसेच नैसर्गिक व सेंद्रिय शेतीच्या बळकटीकरणामध्ये पशुधनाचे असलेले योगदान यावर सविस्तर विवेचन केले. याशिवाय देशी गोवंशाचे जतन व संवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगत पशुपालन व्यवसायात महिलांचा सक्रिय सहभाग, त्यांचे आर्थिक सक्षमीकरण आणि ग्रामीण विकासातील त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेतीसाठी देशी गोवंशाचे संवर्धन अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संशोधन संचालक डॉ. भगवान असेवार यांनी विद्यापीठाद्वारे शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन यासाठीच्या कार्याचे महत्व नमूद केले.

प्रमुख वक्ते डॉ. विश्वास साळुंखे यांनी देशी गोवंशाचे वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म, त्यांची रोगप्रतिकारक क्षमता, हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता, संतुलित आहार व्यवस्थापन, आधुनिक पशुधन व्यवस्थापन, पशू आरोग्य संवर्धन, लसीकरण, रोगप्रतिबंधक उपाययोजना तसेच पशुपालकांनी दैनंदिन व्यवस्थापनात घ्यावयाची आवश्यक काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी देशी गोवंशाचे वैज्ञानिक पद्धतीने संगोपन करून दुग्धोत्पादनासह शेतीच्या शाश्वत विकासाला चालना देता येते, असे प्रतिपादन केले.

प्रास्ताविकात विभागप्रमुख डॉ. गजेंद्र लोंढे यांनी विद्यापीठातील संकरीत गो-पैदास प्रकल्पामार्फत गेल्या २५ वर्षांपासून शुद्ध देशी गोवंशाचे संवर्धन तसेच उत्पादन व प्रजनन गुणधर्मांवरील संशोधन सुरू असल्याची माहिती दिली. शेती व पशुधन हे एकमेकांना पूरक असून नैसर्गिक व सेंद्रिय शेतीच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पशुधन संवर्धन अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पशुपालक प्रतिनिधी श्री. शिवप्रसाद मारोती कोरे (रा. राणी सावरगाव, ता. गंगाखेड), श्री. परमेश्वर शिवमूर्ती स्वामी (रा. इटोली, ता. जिंतूर), श्री. विजय प्रल्हादराव खिस्ते पाटील (रा. ताडबोरगाव, ता. मानवत) तसेच श्री. रामेश्वर किशनराव मांडगे (रा. बेलवाडी, जि. हिंगोली) यांनी मनोगत व्यक्त करत शाश्वत शेतीसाठी पशुधनाचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रमुख अन्वेषक डॉ. अनिल गोरे यांनी सेंद्रिय व नैसर्गिक शेतीमध्ये पशुधनाची भूमिका स्पष्ट केली. संशोधन संचालक डॉ. भगवान असेवार यांनी बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर भारतीय देशी गोवंशाचा काटकपणा, हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता तसेच शेतीतील अवशेष व चारा संसाधनांचा प्रभावी वापर याविषयी मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन डॉ. दत्ता बैनवाड यांनी केले, तर आभार डॉ. प्रभाकर पडघान यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. जी. पी. भोसले, श्री. रवी काळे, श्री. विश्वंभर शिंदे, श्री. महेंद्र कचरे, श्री. माणिक शिंदे तसेच पदव्युत्तर व आचार्य पदवीचे विद्यार्थी, कर्मचारी, मजूर बांधव व भगिनी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मुख्यमंत्री वाढदिवस आणि अजितदादा पवार यांच्या जयंती पार्श्वभूमीवर माणगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न

**बोरघर, माणगांव :** बुधवार दिनांक २२ जुलै २०२६ रोजी रायगड जिल्ह्यातील तालुका माणगांव येथील गांधी हॉल मध्ये "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर" उत्साहात संपन्न २,७४८ लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ, अनाथ लाभांतर्गत पोलीस शिपाई पदी निवड झालेल्या युवकाचा विशेष सन्मान

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार, जनतेच्या दारी कल्याणकारी योजनांचा लाभ थेट पोहोचवण्यासाठी आज दिनांक २२ जुलै, २०२६ रोजी माणगांव येथील ज. गांधी मेमोरिअल सभागृहात "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान" अत्यंत उत्साहात पार पडले. मा. मुख्यमंत्री महोदयांचा जन्मदिवस व माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून १९३-श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात श्रीवर्धन, माणगांव, म्हसळा, तळा व रोहा या तालुक्यातील लाभार्थ्यांसाठी भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर भव्य शासकीय कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री, मा. ना. कु. आदितीताई तटकरे ह्या मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच मा. श्री. प्रशांत शिंदे, संपर्क प्रमुख, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान, १९३-श्रीवर्धन विधानसभा मतदार संघ हे उपस्थित होते. मा. मुख्यमंत्री महोदयांचा जन्मदिवस व माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून १९३-श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास मतदारसंघातील



लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे वरिष्ठ शासकीय अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अनाथ लाभार्थीचा सत्कार :** सदर शिबिरामध्ये एकूण २,७४८ नागरिकांना निरनिराळ्या योजनांचा लाभ मंजूर करण्यात आला, ज्यातील १०६ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मंचावर मान्यवरांच्या हस्ते लाभ सुपूर्द करण्यात आले, तसेच यामध्ये प्रामुख्याने शासनाच्या सूचनेनुसार, समाजातील वंचित व दुर्लक्षित घटक असलेल्या अनाथ घटकाला प्राधान्याने लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. या अनुषंगाने तालुक्यातील ढालघर येथील रहिवासी श्री. ओंकार अनिल शिंदे या युवकास माणगांव प्रशासनाने तत्परतेने अनाथ प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले. या प्रमाणपत्राच्या आधारे अनाथ समांतर आरक्षणांतर्गत ओंकार शिंदे यांची मुंबई पोलीस विभागात पोलीस शिपाई पदी निवड झाली आहे. या यशाबद्दल मा. मंत्री ना. कु. आदितीताई तटकरे यांच्या हस्ते शिबिरात त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

विविध शासकीय विभागांमार्फत वितरीत करण्यात आलेल्या लाभ माहिती खालीलप्रमाणे-

**१. महसूल विभाग :** महसूल विभागामार्फत सर्वाधिक नागरिकांना विविध दाखले व योजनांचा लाभ देण्यात आला. त्यामध्ये १,५८८ नागरिकांना जात प्रमाणपत्र, डोमेसाईल, उत्पन्न दाखले, ई. प्रमाणपत्र, ३९७ शेतकऱ्यांना जिवंत ७/१२ मोहिमेतर्गत सुधारित ७/१२, ६७ शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक कार्ड, ६१ लाभार्थ्यांना संजय गांधी योजनेचे मंजुरी आदेश, ५३ कुटुंबांना नवीन रेशन कार्ड, २७ नागरिकांना जन्म-मृत्यू नोंदणीचे अधिकृत आदेश, ३ महिलांना जमिनीवर हक्क मिळवून देत लक्ष्मी मुक्ती योजनेचा लाभ, देण्यात आले आहे.

**२. पंचायत समिती व शिक्षण विभाग :** स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ११ महिला बचत गटांना वैयक्तिक व्यवसायासाठी आर्थिक अनुदान देण्यात आले तसेच शिक्षण विभागामार्फत ११ गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले व ३७ लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा वाटप करणेत आले आहे.

**३. तालुका आरोग्य विभाग :** आरोग्य सेवेचा विस्तार करण्यासाठी २२१ नागरिकांना आभा कार्ड आणि आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात आले.

**४. नगरपंचायत विभाग माणगांव:** शहरी भागातील बेघर व गरजू नागरिकांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअर्तंगत ६२ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी दिली तसचे शबरी आदिवासी घरकुल योजनेअर्तंगत ३५ आदिवासी कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात आला.

**५. एस.टी. महामंडळ माणगांव आगार :** प्रवाशांच्या सुविधेसाठी एस.टी. महामंडळाकडून ४८ नागरिकांना N.C.M.C. स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले आहे.

**६. तालुका कृषी विभाग :** कृषी विभागामार्फत ४६ शेतकऱ्यांना प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना व इतर कृषी योजनांचे लाभ देण्यात आले.

**७. भूमि अभिलेख कार्यालय :** जमिनींच्या मोजणीशी संबंधित ४७ नागरिकांना मोजणीची सनद सुपूर्द करण्यात आली.

**८. एकात्मिक बाल विकास प्रकल्प :** महिला व बाल कल्याणासाठी विविध उपक्रम राबवून लेक लाडकी व प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजनेअंतर्गत २५ माता व बालकांना योजनेचा लाभ देण्यात आला, ५ लाभार्थ्यांना पूर्व शालेय कीट्स वाटप, ३ नवजात बालकांच्या मातांना बेबी केअर किट सुपूर्द करण्यात आले.

शासकीय योजनांचा लाभ थेट आणि जलद गतीने तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवणे हाच या अभियानाचा मुख्य उद्देश असून, आजच्या या भव्य शिबिरास श्रीवर्धन मतदारसंघातील नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# उद्योग मंत्री उदय सामंत छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत हे उद्या शुक्रवार, दिनांक २४ जुलै रोजी एका दिवसाच्या जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात विविध विभागांचे आढावा सत्र, औद्योगिक संघटनांशी चर्चा, पत्रकार परिषद आणि आषाढी एकादशीनिमित्त विशेष महाभिषेक सोहळ्याला ते हजेरी लावणार आहेत.उद्या सकाळी ८.३० वाजता त्यांचे विमानाने छत्रपती संभाजीनगर येथे आगमन झाल्यानंतर काही वेळ ते राखीव असतील. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता शेंद्रा औद्योगिक वसाहतीतील ऑरिक हॉल, डी.एम.आय.सी. येथे उद्योग विभागाची महत्त्वाची आढावा बैठक पार पडेल. या बैठकीनंतर दुपारी १२.०० वाजता याच ठिकाणी विविध औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी ते संवाद साधणार आहेत. दुपारी २.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा विभागाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली असून यादरम्यान ते स्थानिक साहित्यिकांशी संवाद साधतील. त्यानंतर दुपारी ३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातच त्यांची पत्रकार परिषद होईल. रात्री ११.०० वाजता आषाढी एकादशीनिमित्त छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील वळदगाव येथील पंढरपूर येथे आयोजित महाभिषेक व विशेष पूजा सोहळ्यास ते उपस्थित राहणार आहेत. या धार्मिक सोहळ्यानंतर ते शहरात परतणार असून येथेच मुक्काम करतील आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ६.१५ वाजता चिकलठाणा विमानतळावरून मुंबईकडे रवाना होतील.

# जिल्हा परिषदेतील प्रतिनियुक्तीला लगाम घाला; वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी असलेल्यांची बदली करा

## कास्ट्राईब संघटनेची मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. यांच्याकडे जोरदार मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषदेत अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे प्रतिनियुक्तीवर एकाच ठिकाणी कार्यरत असल्याने प्रशासनातील संधींचे समान वाटप होत नसल्याचा मुद्दा कास्ट्राईब जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेने जोरदारपणे उपस्थित केला. अशा कर्मचाऱ्यांची बदली करून इतर पात्र कर्मचाऱ्यांनाही संधी द्यावी, अशी प्रमुख मागणी संघटनेने मुख्य कार्यकारी अधिकारी (आयएएस) श्रीमती मिनू पी. एम. यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत केली. यासह मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर प्रशासनाशी सविस्तर चर्चा झाली.



जिल्हा परिषदेच्या वेरूळ सभागृहात झालेल्या या बैठकीत सरळ सेवा भरतीतील अनुशेष तातडीने भरणे, आरक्षण रोस्टर अद्ययावत करणे, प्रलंबित पदोन्नती व अनुकंपा भरती प्रक्रिया पूर्ण करणे, दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा फरक देणे, सर्व विभागांतील कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करणे, आंतरजिल्हा बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार आगाऊ वेतनवाढ देणे, अनुसूचित जमातीच्या अधिसंख्य पदांबाबत निर्णय घेणे, वर्ग-४ कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता यादी अद्ययावत करणे तसेच सिंचन विभागातील कनिष्ठ अभियंत्यांकडून सेवा वर्गीकरणापूर्वी लेखी विकल्प घेण्याची मागणी करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. यांनी सर्व खातेप्रमुखांना कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने निकाली काढण्याचे निर्देश दिले. कोणताही प्रश्न प्रलंबित ठेवू नका, तसेच कर्मचाऱ्यांनी अडचणींसाठी औपचारिक बैठकीची वाट न पाहता थेट संबंधित अधिकारी किंवा स्वतः त्यांच्याशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, चंद्रहार ढोकणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. धानोरकर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. कास्ट्राईब संघटनेचे वरिष्ठ राज्य उपाध्यक्ष सुमित भुईगळ यांच्या नेतृत्वाखाली बी. एम. म्हस्के, डॉ. संजय वाघ, सुशीलकुमार बनकर, तेजस्विनी तुपसागर, केवळसिंह सुलाने, दीक्षांत खंडागळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी सुमित भुईगळ यांनी प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेबद्दल आभार व्यक्त केले.

# 'प्रोजेक्ट आरोग्य मम्मे'चा शुभारंभ; आशा सेविकांची मोफत मॅमोग्राफी तपासणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या आरोग्य संरक्षणासाठी 'प्रोजेक्ट आरोग्य मम्मे' या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. पहिल्या टप्प्यात 20 आशा सेविकांची मोफत मॅमोग्राफी तपासणी करण्यात आली. कार्यक्रमास महानगरपालिका आयुक्त डॉ. अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे, नगरसेविका अनिता घोडिले, माजी महापौर नंदकुमार घोडिले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी अत्याधुनिक मॅमोग्राफी मशीनचे उद्घाटन करण्यात आले.

कमलनयन बजाज हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांनी सांगितले की, स्तनाच्या कर्करोगाचे वेळेत निदान झाल्यास उपचार यशस्वी होऊ शकतात. त्यामुळे 'प्रोजेक्ट आरोग्य मम्मे' अंतर्गत महानगरपालिकेतील सर्व महिला कर्मचारी आणि महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांची टप्प्याटप्प्याने मोफत मॅमोग्राफी तपासणी केली जाणार आहे. महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करून कर्करोगाबाबत जागरूक राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# जिंतूर येथे 31 जुलै रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**परभणी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जिंतूर येथील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय आणि अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर (दिंडोरी प्रणित), नाशिक, शाखा आमदार कॉलनी, जिंतूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. 31 जुलै 2026 रोजी सकाळी 8.30 ते दुपारी 12.30 या कालावधीत जिंतूर येथील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागामार्फत जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना खासगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात राज्यातील विविध नामांकित उद्योग, कंपन्या व खासगी आस्थापनांचा सहभाग राहणार आहे.



मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी तसेच इतर शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांची क्षेत्र अधिकारी (SFO), क्षेत्र अधिकारी (RO), ट्रेनी ऑपरेटर, विमा सल्लागार, विमा सखी, लाईफ मित्र, कार्यालयीन कर्मचारी (ऑफिस स्टाफ) आदी पदांसाठी मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी प्रारंभीचे मासिक वेतन रु. 10 हजार ते रु. 25 हजार इतके असून अनुभवाच्या आधारे वेतनात वाढ होऊ शकते.

रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाच्या mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नावनोंदणी करावी. तसेच प्रत्यक्ष नावनोंदणीसाठी व मुलाखतीसाठी इच्छुक उमेदवारांनी दि. 31 जुलै 2026 रोजी आवश्यक कागदपत्रांसह स्वखर्चाने श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर वरिष्ठ महाविद्यालय, जिंतूर येथे उपस्थित राहावे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त प्र. सो. खंदारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक 02452-220074 वर संपर्क साधावा.

# महाराष्ट्रात 'आकाशबीज'चा विक्रम; 85 हजारांहून अधिक सीडबॉल्सची निर्मिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पर्यावरण संवर्धनासाठी धर्मन वेल्फेअर असोसिएशन आणि PSBA इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'आकाशबीज' सीडबॉल निर्मिती उपक्रमात महाराष्ट्रात विक्रमी कामगिरी नोंदविण्यात आली. इयत्ता पहिली ते नववीतील २ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत तब्बल ८५ हजारांहून अधिक सीडबॉल्स तयार केले. एका शालेय उपक्रमातून इतक्या मोठ्या प्रमाणात सीडबॉल्स तयार करण्याचा हा राज्यातील पहिलाच विक्रम असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे.

धर्मन वेल्फेअर असोसिएशनच्या कार्यकारिणी सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली, शाळेचे व्यवस्थापन, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी झाला. प्रत्येक विद्यार्थ्याने सरासरी ४५ ते ५० सीडबॉल्स तयार करून पर्यावरण संरक्षणात आपले योगदान दिले. हे सीडबॉल्स पावसाळ्यात डोंगराळ व मोकळ्या परिसरात पेरण्यात येणार असून, त्यातून वृक्षसंवर्धन, जैवविविधतेचे जतन आणि हरित क्षेत्र वाढविण्यास हातभार लागणार आहे. उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीवही अधिक दृढ करण्यात आली.

# पैठणमध्ये शिवसेनेचे 'रामरक्षा आंदोलन'

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** अयोध्या येथील श्रीराम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने राज्यभर सुरू असलेल्या 'रामरक्षा आंदोलन' अंतर्गत गुरुवारी पैठण येथील श्रीराम मंदिरात महाआरती व सामूहिक रामनाम जप करण्यात आला. यावेळी रामरक्षा, भीमरूपी स्तोत्र आणि हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करून श्रीराम चरणी प्रार्थना करण्यात आली.



या आंदोलनात शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, उपनेते सुभाष पाटील, जिल्हासंघटक तथा माजी महापौर सुदाम सोनवणे, शिक्षक सेनेचे पद्माकर इंगळे, तालुकाप्रमुख मनोज पेरे, डॉ. सुनील शिंदे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने रामभक्त उपस्थित होते. राज्यभर सुरू असलेल्या या आंदोलनाचा पुढील टप्पा म्हणून शुक्रवारी (२४ जुलै) सायंकाळी ६ वाजता फुलंब्री येथील श्रीराम मंदिरात महाआरती आयोजित करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# एमजीएममध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवरील अध्यापक विकास कार्यक्रमाचा शुभारंभ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीत 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड जनरेटिव्ह एआय फॉर इंडस्ट्रियल ॲप्लिकेशन्स' या विषयावरील तीन दिवसीय अध्यापक विकास कार्यक्रमाचा गुरुवारी शुभारंभ झाला. हा कार्यक्रम SAEINDIA आणि ISHRAE छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे.



उद्घाटनप्रसंगी कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, SAEINDIAचे अध्यक्ष प्रसाद कोकीळ, ISHRAEचे माजी अध्यक्ष राजेंद्र करमळकर, तज्ज्ञ अभ्यासक डॉ. अभिषेक पतंगे, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, संचालिका डॉ. परमिंदर कौर धिंग्रा यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. सपकाळ यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, जनरेटिव्ह एआय आणि लार्ज लँग्वेज मॉडेल्समुळे शिक्षण व उद्योग क्षेत्रात मोठे परिवर्तन होत असल्याचे सांगत, प्राध्यापकांनी सातत्याने कौशल्यवृद्धी करणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. प्रसाद कोकीळ यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे अध्यापनात नावीन्यपूर्ण प्रयोगांना चालना मिळाल्याचे सांगितले, तर राजेंद्र करमळकर यांनी उद्योगक्षेत्रातील प्रेडिक्टिव्ह मेंटेनन्स, डिझाइन आणि संशोधनासाठी एआयचे वाढते महत्त्व अधोरेखित केले.

कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी एमजीएम विद्यापीठ उद्योगाभिमुख आणि 'फ्युचर-रेडी' विद्यार्थी घडविण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर भर देत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालिका डॉ. परमिंदर कौर धिंग्रा यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. विकास लोकावार यांनी, तर आभार प्रा. जावेद सिद्दीकी यांनी मानले.

# कळमनुरी वकील संघाचे राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना दिल्ली विद्यार्थी लाठीचार्जच्या निषेधार्थ निवेदन

**हिंगोली :** भारत सरकारचे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी २० जुलै २०२६ रोजी लाखो विद्यार्थ्यांनी संसद भवनावर मोर्चा काढला होता त्यावर दिल्ली पोलिसांनी अमानुष लाठीचार्ज करून अश्रुधुरांच्या नळकांड्या टाकून हजारो विद्यार्थ्यांना बेदम मारहाण करून जखमी केले, या घटनेच्या निषेधार्थ आज दिनांक २३ जुलै २०२६ रोजी कळमनुरी वकील संघाच्या वतीने *महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू* यांना उपविभागीय कार्यालयाचे नायब तहसीलदार श्री. किन्होळकर यांच्यामार्फत निवेदन देऊन मागण्या करण्यात आल्या की दिल्ली मोर्चातील विद्यार्थ्यांवर



लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांची सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशा मार्फत चौकशी करून दोषीं अधिकाऱ्यांना निलंबित करावे, शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा, राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) बरखास्त करावी, मेडिकल प्रवेश परीक्षा (नीट)-२०२६ पेपर फुटी व निकालातील घोटाळ्यांची पारदर्शक चौकशी करावी, मेडिकल व इंजिनिअरिंगची परीक्षा राज्यस्तरावरच घ्यावी, नीट परीक्षा घोटाळ्यामुळे ज्या २३ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली त्यांच्या कुटुंबीयांना एक करोड रुपयांचे आर्थिक सहाय्य करावे ,शिक्षणाचे खाजगीकरण बंद करावे या मागण्या करण्यात आल्या.

कळमनुरी वकील संघाच्या सदस्यांनी न्यायालय परिसरातून उपविभागीय कार्यालयावर जात *"पोलीस लाठीचार्ज नही चलेगा!", "मोदी सरकार मुर्दाबाद!"*, "*मोदी जब जब डरता है पोलीस को आगे करता है!*", "*धर्म की लढाई झुठी है देश की जनता भुखी है!" "*इन्कलाब जिंदाबाद!"* *"जय भीम जय भीम जय बिरसा!" *"डॉ. बाबासाहेब आंबेडकर शहीद भगतसिंग महात्मा गांधी यांचा विजय असो!"*"*वकील-विद्यार्थी एकजुटीचा विजय असो!* अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

या आंदोलनात कळमनुरी वकील संघाचे अध्यक्ष ॲड.इफ्तेखार नाईक, उपाध्यक्ष ॲड.सुनील घोंगडे,सचिव अँड.प्रभाकर मोरे, माजी अध्यक्ष ॲड.रवि शिंदे, ॲड.मोहम्मद इकबाल,अँड.के.पी. जोंधळे, ॲड.अझरुद्दीन कादरी, ॲड.शाकेर सिद्दिकी ,अँड.लुगडे पाटील,ॲड.डी.एस.पाईकराव, ॲड.एल.एल.सिरसाट,ॲड.एस.टी. नरवाडे, ॲड.जे.आर.जाधव, ॲड.जी. एम.नागरे,अँड.अविनाश काळे,अँड. डी.पी.जाधव, अँड.मल्हारी खोकले,ॲड.कुणाल इंगोले,ॲड. अझर पठाण, ॲड.गुणरत्न पतंगे,ॲड.महेंद्र खिल्लारे,ॲड. धम्मानंद सोनुले, ॲड.शेख शकील,अँड.बुद्धरत्न बलखंडे,ॲड. पि.के.तडस, ॲड.एस.एम.अली,ॲड. झिशान नाईक आदी सामील होते

# उत्तम उपहार गृहावर कारवाई, लायसन्स रद्द, दुकान सील

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या व्यावसायिकांवर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) धडक कारवाईचा बडगा उगारला आहे. शहरातील गुलमंडी रोडवरील अत्यंत प्रसिद्ध असलेल्या 'उत्तम उपहार गृह' येथे प्रशासनाने अचानक छापा टाकत मोठी कारवाई केली आहे. तपासणीदरम्यान ग्राहकांच्या आरोग्याशी थेट खेळणारे अत्यंत धक्कादायक प्रकार उघडकीस आले असून, या उपहारगृहाचा परवाना तात्काळ निलंबित करत आस्थापना सील करण्यात आली आहे.

या धडक तपासणीत उपहारगृहाचे स्वयंपाकघर अत्यंत अस्वच्छ असल्याचे निदर्शनास आले. अन्न तयार करण्याच्या आणि साठवण्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर कीटकांचा आणि झुरळांचा सुळसुळाट आढळला. सर्वात संतापजनक म्हणजे, खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी वारंवार पुनर्वापर केलेले निकृष्ट खाद्यतेल व वनस्पती तुपाचा वापर केला जात असल्याचे स्पष्ट झाले. याशिवाय, उपहारगृहात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे कोणतेही वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र (Medical Fitness Certificate) नव्हते आणि अन्नसुरक्षा नियमांचे अक्षरशः धिंडवडे उडवले जात असल्याचे एफडीएच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. प्रशासन आणि नियमांची कसलीही पर्वा न करता सुरू असलेल्या या गैरकारभाराची गंभीर दखल घेत एफडीएने तात्काळ परवाना रद्द करत हॉटेल बंद केले आहे. अधिकारींनी जप्त केलेले खाद्यतेल आणि वनस्पती तुपाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले असून, अहवाल हातात आल्यावर संबंधितांवर आणखी कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. या दणक्यामुळे शहरातील खानावळी आणि उपहारगृह चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# सेलू येथे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमातंर्गत राजकीय पक्ष व पत्रकारांची बैठक संपन्न

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

परभणी – भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत सेलू येथे उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांचे पदाधिकारी, बूथ लेव्हल एजंट आणि पत्रकारांची बैठक संपन्न झाली. बैठकीस नगराध्यक्ष मिलिंद सावंत, तहसिलदार डॉ. शिवाजी मगर, नगरपालिका मुख्याधिकारी महेश गायकवाड, सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकारी, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि पत्रकार उपस्थित होते. बैठकीत विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. सेलू तालुक्यातील 1,45,592 मतदारांपैकी 1,42,835 मतदारांना गणना फॉर्म वितरित करण्यात आले असून 1,11,834 (76.81 टक्के) फॉर्मचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे, अशी माहिती देण्यात आली. दि. 8 ऑगस्टपर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी गृहभेटी घेणार असून 17 ऑगस्ट रोजी प्रारूप आणि 19 ऑक्टोबर 2026 रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दावे व हरकतींवर 17 ऑगस्ट ते 16 सप्टेंबर दरम्यान सुनावणी होणार असल्याचेही सांगण्यात आले. यावेळी शैलेश लाहोटी यांनी सर्व राजकीय पक्ष, बीएलए आणि पत्रकारांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करून मतदार यादी अचूक व अद्ययावत करण्यासाठी जनजागृती करावी, असे आवाहन केले.

# सोयगावच्या इतिहासातील सर्वात मोठ्या जनआरोग्य शिबिराला विक्रमी प्रतिसाद

## 2,000 रुग्णांची तपासणी,68 गंभीर रुग्ण उपचारासाठी संदर्भित,600 चष्म्यांचे,568 चालण्याच्या काठ्यांचे व 500 आयड्रॉपचे मोफत वाटप

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

सोयगाव,दि.२३ जुलै

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त टीम समर्पण फाउंडेशन आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या समन्वयाने दि.२२ बुधवार रोजी ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथे मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले.

समर्पण फाउंडेशन च्या टीम च्या सदस्यांनी वर्गणी करून स्वखर्चाने हा आरोग्याचा महायज्ञ सोयगाव शहरात घडवून आणल्या बद्दल याचे सर्वत्र कौतुक होत आहे





या शिबिरामध्ये मेडिसिन,जनरल सर्जरी,कर्करोग,हृदयरोग, नेत्ररोग,अस्थिरोग, स्त्रीरोग,कान-नाक-घसा,दंतरोग,बालरोग आदी विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची मोफत तपासणी करून आवश्यक उपचार व मार्गदर्शन केले. सोयगाव परिसरातील गावांमधून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला.शिबिरामध्ये एकूण २००० रुग्णांची तपासणी करण्यात आली.यापैकी ६८ गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी विविध विशेष रुग्णालयांकडे संदर्भित करण्यात आले.तसेच गरजूंना ६०० चष्म्यांचे,५६८ चालण्याच्या काठ्यांचे आणि ५०० आयड्रॉपचे मोफत वाटप करण्यात आले.

याशिवाय २७ रुग्णांना सलाईन,११२ रक्त तपासण्या आणि ८६ ईसीजी तपासण्या करण्यात आल्या.तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनामुळे अनेक रुग्णांना वेळेत पुढील उपचाराची दिशा मिळाली.या महत्त्वाकांक्षी जनआरोग्य उपक्रमात ग्रामीण रुग्णालय सोयगाव,रूबी स्टार रुग्णालय (जामनेर), शासकीय कर्करोग रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर, मराठवाडा कॅन्सर रुग्णालय,जे.जे.प्लस रुग्णालय,ओरियन सिटिकेअर रुग्णालय,सेंचुरी रुग्णालय,सेठ नंदलाल धूत रुग्णालय,डॉ. हेडगेवार रुग्णालय तसेच कर्णावत कर्करोग रुग्णालय आणि संतपुरे रुग्णालय यांनी सक्रिय सहभाग नोंदवून तज्ज्ञ वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या.

समाजातील प्रत्येक गरजू नागरिकापर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व तज्ज्ञ डॉक्टर, सहभागी रुग्णालये, आरोग्य विभाग, स्वयंसेवक, सहकार्य करणाऱ्या संस्था तसेच उपस्थित नागरिकांचे समर्पण फाउंडेशन आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911